MHSN030044652025

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५६०/२०२५ मधील निशाणी १ वरील आदेश**

(राजू ठोकळ वि. महाराष्ट्र सरकार)

सदरचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ नुसार सायबर गुन्हयात बँकेच्या खात्यातील होल्ड केलेल्या रक्कमेचा अंतरिम ताबा मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. अर्जदारचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार हे माजी सैनिक आहेत त्यांनी कोणत्याही लिंकला अथवा वेबसाइट ला भेट दिली नाही. मात्र दि. १५/०१/२०२५ रोजी त्यांच्या मोबाईलवर मेसेज आला की, त्यांच्या खात्यातुन रु. ९७,०००/– कट झाले आहेत. अर्जदाराने गोंधळून त्यांच्या बँकेशी संपर्क साधला असता बँकेने ऑनलाईन सायबर सेल ला तक्रार देण्याचे सुचविले त्यानुसार त्यांनी सायबर सेलला ऑनलाईन तक्रार दाखल केली. पोलीसांनी सदर तक्रारीच्या अनुषंगाने त्वरीत दखल घेवून फ्रॉड झालेली रक्कम बंधन बँकेच्या खात्यामध्ये दि. १६/०१/२०२५ रोजी होल्ड केलेली आहे.

३. सदरची होल्ड करण्यात आलेली रक्कम अर्जदाराने त्यांना परत मिळण्याची विनंती केली आहे. यांचे आय सी आय सी आय बँक मिरज येथील खाते क्रं. ०३३९०१५०७९२८ वर वर्ग करण्याची त्यांनी विनंती केली आहे. सबब, त्यांनी रक्कम परत मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदाराने सदर अर्जासोबत पुढील कागदपत्रे सादर केली आहेत.

१. अर्जदाराचे आधार कार्डची प्रत,

२. आय सी आय सी आय बँकेचा खातेउतारा

३. ऑनलाईन तक्रारीची ॲकनॉलेजमेंट दाखल केली आहे.

४. तपासी अंमलदार व सरकारपक्षाने आपले म्हणणे दाखल केले. तपासी अंमलदार यांनी सदरची रक्कम अर्जदार यांना परत देण्याबाबत योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे. तसेच सरकार पक्षाने हरकत घेऊन आपल्या म्हणण्यात कथन केले की, प्रकरणात एफ आय आर दाखल नाही, सदर प्रकरणात आरोपीचे म्हणणे घेणे आवश्यक आहे, ज्या खात्यावर रक्कम अदा केली आहे ती फसवणुक होऊन पाठविलेली रक्कम आहे किंवा कसे याबाबत पुरावा नाही.

५. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, अर्जदाराचे आय सी आय सी आय बँक मिरज येथील खाते क्रं. ०३३९०१५०७९२८ यावरुन र.रु. ९७,०००/- वर्ग झाले आहेत. त्यापैकी पोलीसांनी पंजाब नॅशनल बँकेच्या खाते क्रं. ४०८२०००१००१४५१९७ मध्ये ट्रान्झेक्शन नंबर १८५४९०८२६२०७ अन्वये रु ७९५/- तसेच एच डी एफ सी बँकेच्या खाते क्र. ५०२०००९८१६४५५२ ट्रान्झेक्शन नंबर ७३७८८०७१५३५६ अन्वये रु. ४०,०००/- होल्ड केली आहेत. अर्जदारशिवाय इतर कोणीही सदरची रक्कम मागितल्याचे अभिलेखावरुन दिसुन येत नाही. सबब, सदरची रक्कम अर्जदारची असल्याचे प्राथमिकरित्या दिसुन येते. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. तपासी अंमलदार, विश्रामबाग पोलिस स्टेशन यांना निर्देश देण्यात येतात की, सायबर पोर्टल अर्ज १४/२५ सायबर ॲकनॉलेजमेंट नंबर २१९०१२५०००६७८५ च्या तपासादरम्यान अर्जात नमुद रक्कम रु.९७,०००/- पैकी पंजाब नॅशनल बँकेच्या खाते क्रं. ४०८२०००१००१४५१९७ मध्ये ट्रान्झेक्शन नंबर १८५४९०८२६२०७ अन्वये रु ७९५/- तसेच एच डी एफ सी बँकेच्या खाते क्र. ५०२०००९८१६४५५२ ट्रान्झेक्शन नंबर ७३७८८०७१५३५६ अन्वये रु. ४०,०००/- येथे होल्ड केलेली रक्कम ही अर्जदार यांचे खाते असलेल्या आय सी आय सी आय बँक मिरज येथील खाते क्रं. ०३३९०१५०७९२८ या खात्यावर वर्ग करण्यात यावी.

३. अर्जदारने रक्कम रु.४०,७९५/- चे बंधपत्र रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर संबंधित पोलिस ठाण्यात ओळखपत्रासह सादर करावे.

४. तपासी अंमलदाराने पंचनामा व अहवाल प्रकरणात दाखल करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VEDVATI ANIRUDHA ADYA
Date: 2026.07.16 18:03:39 +0530

(वेदवती अ. आद्य)

दिनांक – १६/०७/२०२६ ६ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | ----- |
| Name of Court | V.A. Adya<br>J.M.F.C.,Court No.3, Sangli. |
| Date of Dictation | 16/07/2026 |
| Order signed by the P.O. on | 16/07/2026 |
| Order uploaded on | 16/07/2026 |